# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. कविता दीक्षित

---

लय तालानी नटुनि सजुनी, सप्तसुरांनी न्हाले,
श्रुंगारुनि भव भावनांना, संगीत उदया आले....

सुमधुर कला सुरेल, अनमोल जीवनाची
संगीत सहज वाहे, संवेदना मनीची ||धृ||

वात्सल्य भक्ती करूणा, प्रीती विरह विवेक
संगीत व्यक्त करते, आंदोलने अचूक ||१||

अंगाईगीत शमते, निमिशात तान्हुलीला
स्मितहास्य येई ओठी, स्वप्नी बघुन आईला ||२||

सुस्वर सुश्राव्य सुमधुर, देताच हाक आर्त
ईश्वर प्रसन्न होई, ऐकूनि भक्तिगीत ||३||

जागे हृदयी प्रीती, सुर घेतां चित्त ठाव
स्वरमय ते बंध तरती, साताही जन्मी नाव ||४||

दु:खातही मनाचे, संगीत करते सांत्वन
सामर्थ्य त्यात इतुके, घडवी विचार मंथन ||५||

सुर ताल लय विना हे, आहे असह्य जीवन
अध्यात्म साधनेचे, संगीत हृदयी स्पंदन ||६||

Anahat Music Therapy